# प्रेसनोट

नाशिक,
दि. १३/०९/२०२३

**दिगंबर अर्जुन साळवे, कनिष्ठ लिपीक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, नाशिक यांनी ५०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | दिगंबर अर्जुन साळवे, कनिष्ठ लिपीक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे खाजगी शाळेत शिपाई या पदावर कार्यरत असुन त्यांना नेमणुक दिनांकापासुन अदयापपावेतो कोणतेही वेतन मिळालेले नव्हते सदर वेतन मिळण्यासाठी आवश्यक असलेला शालार्थ क्रमांक मिळणेकामी शाळेच्या मार्फतीने शिक्षणाधिकारी कार्यालयात प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्ताव मंजुर करणेसाठी आलोसे दिगंबर अर्जुन साळवे, कनिष्ठ लिपीक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, नाशिक यांनी तक्रारदार यांचे कडे ५०,०००/- रु. लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे दिगंबर अर्जुन साळवे, कनिष्ठ लिपीक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, नाशिक यांनी तक्रारदार यांचे कडे ५०,०००/-रु. लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि.१३.०९.२०२३ रोजी नाशिक शिक्षण उपसंचालक कार्यालयात स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले असुन त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, गुन्हा नोंदविण्याची पुढील कार्यवाही सुरू आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक्र :- ९९३०९९७७००

13/9/23

( नरेंद्र भा.पवार )
पोलीस उपअधीक्षक ( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक